# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- १६४-२२** **दिनांक - ०७/०६/२०२२**

## घरफोडी करुन चोरी करणाऱ्या अट्टल आरोपीतास काशिमीरा पोलीसांनी केली अटक.

दिनांक ०१/०६/२०२२ रोजी स. ११.१५ वा. ते दु. १५.३० वा.चे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी सौ. सब्रीना शौकत माझगांवकर यांचे घराच्या बाथरुमच्या खिडकीची काच तोडून घरामध्ये प्रवेश करुन बेडरुममधील लाकडी कपाटाचे लॉक तोडून कपाटात ठेवलले एकुण ८,२१,०००/- रुपये किंमतीचे सोने चांदीचे दागीने चोरी करुन नेले होते. सदर घटनेबाबत फिर्यादी सौ. सब्रीना शौकत माझगांवकर व्यवसाय – गृहिणी, रा. विनयनगर, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन काशीमीरा पोलीस ठाणे येथे । गुरनं ३६२/२०२२ भादंवि कलम ४५४, ३८०, ३४ अन्वये दिनांक ०२/०६/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी सपोनि. प्रशांत गांगुर्डे व त्यांचे स्टाफने गुन्हयाचे घटनास्थळावरुन प्राप्त केलेल्या माहितीच्या आधारे व साक्षीदारांकडे विचारपुस करुन संशईताबाबत माहिती मिळवीली. सदर गुन्हा करणारा संशईत हा जय अंबे चाळ, जनतानगर झोपडपट्टी काशिगांव येथे राहत असल्याची अधिक माहिती मिळाल्याने संशईत नामे रवी आबा कांबळे वय २९ वर्षे, व्यवसाय - जे.पी. नॉर्थ येथे सफाई कामगार, रा. भरत शेळके यांचे रुममध्ये भाडेकरु, जय अंबे चाळ, जनतानगर झोपडपट्टी, काशिगांव, मिरारोड पुर्व यास ताब्यात घेवुन विचारपूस केली असता, त्याने सदरचा गुन्हा केल्याची प्राथमिक माहिती दिल्याने त्याचे अंगझडतीमध्ये पँटच्या मागील खिशामध्ये ०२ सोन्याच्या बांगड्या व ०१ सोन्याचे मंगळसुत्र असे नमुद गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल मिळुन आला. तसेच सदर आरोपीने जे. पी. नॉर्थ या बिल्डींगमध्ये विविध ठिकाणी चोरी केली असल्याची माहिती दिल्याने ४ गुन्हयाची उकल करण्यात आली असून त्याचेकडून संपुर्ण तपासादरम्यान २९३.५ ग्रॅम वजनाचे एकुण १४,६७,५००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागीने हस्तगत करण्यात आलेले आहे. सदर आरोपीतास दि. ०२/०६/२०२२ रोजी नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.

सदर आरोपीताकडून खालील नमुद गुन्हे उघड करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम |
|---|---|---|
| १. | काशिमीरा पोलीस ठाणे | १६०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० |
| २. | काशिमीरा पोलीस ठाणे | २४९/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० |
| ३. | काशिमीरा पोलीस ठाणे | ३२८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० |
| ४. | काशिमीरा पोलीस ठाणे | ३६२/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ३८० |

सदरची कामगिरी श्री विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) अती. कार्य. पो.उप.आ. परि-०१, श्री विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली काशिमिरा पोलीस ठाण्याचे वपोनि. श्री संजय हजारे, पोनि. श्री विजय पवार (गुन्हे), स.पो.निरी. श्री प्रशांत गांगुर्डे, पोहवा. गणेश कोळी, पोना. विश्वनाथ जरग, पोशि. निलेश शिंदे, स्वप्नील मोहीले, सतिश निकम, जयकुमार राठोड सर्व नेमणुक- काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.